**सरकारतर्फे साक्षीदार क्र. २**

**<u>नि.फौ.ख.क्र. २१/२०२३</u>**
महाराष्ट्र शासन वि. देविदास
**नि.क्र. ३८**

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.ए. एन. नारनवरे यांच्यामार्फत उलटपासः–</u>**

**०२.** रामचंद्र मनसारामजी बालपांडे हे माझे वडील आहे आणि सुरेंद्र रामचंद्र बालपांडे व राजेंद्र रामचंद्र बालपांडे (फिर्यादी) भाउ आहे. चंद्रकला रामचंद्र बालपांडे हि माझी आई आहे. मी कमला शंकर राकेश ला ओळखतो. गणपती उर्फ गणपतराव नासरे हे कमला शंकर राकेश यांचे भाउ आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही गणपती उर्फ गणपतराव नासरे यांच्याकडून बेकायदेशीर रित्या घर व शेतजमीन विकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, कमला शंकर राकेश यांनी माझ्या विरोधात दिवाणी खटला याच न्यायालयामध्ये दाखल केले आहे आणि ते न्यायप्रविष्ट आहे. हे म्हणणे खरे नाही की, कमला शंकर राकेश यांनी माझे व माझ्या भावां विरुध्द पोलीस स्टेशन येथे रिपोर्ट दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०१/०२/२०२० रोजी मी काही गैरकायदेशीर मंडळी घेउन कमला शंकर राकेश यांची अर्धावट असलेली घर बेकायदेशीर पणे तोडून टाकले. पोलीसांनी माझे बयान घेतले होत.

**०३.** मी पोलीसांना बयान देतांना असे सांगितले नव्हते की, ''पोलीसांनी आम्हाला सांगितले होते की ते चौकशी करीता येणार आणि आम्हाला शेतामध्ये उपस्थित राहण्याचे निर्देश दिले. आरोपी देविदास, मोहन, विनोद व इतर एक आरोपी आमच्या शेतामध्ये आले आणि आम्हाला शिवीगाळ केली. चौघे आरोपींना पोलीसांनी पोलीस स्टेशनला नेले. त्यानंतर पोलिसांनी माझे बयान नोंदविले.'' हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासणीमध्ये सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की,

मी आज रोजी फिर्यादी राजेंद रामचंद बालपांडे यांच्या सांगण्यावरुन न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

<u>**उलटतपास पूर्ण.**</u>

<u>**फेरतपास नाही.**</u>

माझे समक्ष,

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2025.12.18 15:58:58 -0500

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, नरखेड

**दिनांकः १८/१२/२०२५.**

Digitally signed by ROHAN VIJAYKUMAR THAYIL
Date: 2025.12.18 15:58:52 -0500

(रोहन विजयकुमार थाईल)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
नरखेड, नागपूर.

**दिनांकः १८/१२/२०२५**

**माझे उलटतपास मला वाचून दाखविले व ते माझ्या सांगयाप्रमाणे आहे. व Explanation V, Paragraph No. 16, Chapter VI of Criminal Manual प्रमाणे मला त्याचे विनामुल्य खरी नक्कल मिळालेली आहे.**

साक्षीदाराची सही
(रविंद्र रामचंद्र बालपांडे)

विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता
(व्ही. यु. मिरचे)